स्वाध्याय माला

# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. १५४३

BVBK-0401543

आश्विन

वाचनालय
वा.वा.
१५४३
१५१५८३

स्वाध्यायमाला : पुष्प २०७ वे

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# आश्विन मास

म. सं. सं. ठाणे, ... शाखा.
१५४३ - १५१५८३
विषय

लेखिका
सौ. कुमुदिनी रांगणेकर,
मुंबई

★

BVBK-0401543

किंमत ७५ पैसे
~~किंमत ५० पैसे~~

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकाच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिकय म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

९५७३ ९५।९।७३

# आश्विन मास

सहा महिने--अर्धे वर्ष--संपले. आता वर्षाचा दुसरा अर्धा भाग सुरू होत आहे. नि आश्विन हा त्यातला पहिला महिना. आपण जे साडेतीन मुहूर्त मानतो ना? त्यांतला दीड मुहूर्त वर्षाच्या पहिल्या भागात आला होता. पहिला चैत्र महिन्यात गुढी-पाडवा हा एक मुहूर्त नि पुढला वैशाख महिन्यात अक्षय्य-तृतीया हा अर्धा मुहूर्त! गंमत अशी की, वर्षाच्या ह्या दुसऱ्या भागातही असेच ओळीने दोन मुहूर्त येतात. ह्या भागातील पहिला महिना आश्विन--नि आश्विन शुद्ध दशमीला दसऱ्याचा मुहूर्त असतो, आणि पुढच्या कार्तिक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेला बळी पाडवा हा मुहूर्त असतो!

वर्षाच्या दोन भागांपैकी प्रत्येक भागाच्या आरंभीच्या दोन महिन्यांत दोन मुहूर्त येतात बरं! कोणत्याही कामाची सुरुवात चांगल्या वेळी केली की ते काम नीट पार पडते. कारण आपल्याला शुभ मुहूर्ताचा आधार आहे, असा विश्वास मनाला वाटतो नि त्यामुळे आपले नैतिक, मानसिक व शारीरिक बळ वाढते.

म्हणूनच नव्या वर्षाच्या आरंभीच्या दोन महिन्यांत दोन मुहूर्त येत असतात. चांगला दिवस हाताशी नाही म्हणून अळंटळं करावयास नको ! घ्या शुभ मुहूर्त नि करा शुभ कार्याला प्रारंभ!

ह्याचप्रमाणे पुढल्या सहामाहीतही पहिल्या दोन महिन्यांत उत्तम दोन मुहूर्त हजर ठेवले आहेत. त्याचा फायदा मात्र करून घ्यायला हवा प्रत्येकाने.

पहिल्या सहामाहीत अभ्यासाचे बूड चांगलं स्थिर झाले नाही. हरकत नाही ! पुढल्या सहामाहीत दसऱ्याच्या मुहूर्तावर अभ्यासाची मोहीम सुरू करा. नक्की फत्ते व्हाल !

पूर्वी मोठे मोठे वीर दसऱ्याच्या मुहूर्तावरच शिलंगणाची स्वारी काढीत नि शत्रूचा पराभव करीत. तुम्हीही आळसरूपी शत्रूचा पराभव करा नि परीक्षेत विजयी व्हा.

तेव्हा आश्विन महिना मोठा चांगला आहे. आता चौथा ऋतू शरद् सुरू होतो आहे. ह्या दिवसात दक्षिणेकडील मलय पर्वतावरून थंड वारे वाहात येतात. पावसाळ्याचा जोर कमी असतो नि आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्राच्या उत्सवाला नि आनंदाला सुरुवात होते.

**नवरात्राचा उत्सव**

आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून शुद्ध नवमीपर्यंत महिषासुर-मर्दिनी देवीचा उत्सव साजरा करतात.

ऐका हं ह्या देवीच्या जन्माची कथा. फार पूर्वी स्वर्गात महिषासुर ह्या नावाचा एक राक्षस फार उन्मत्त झाला होता. सर्वांवर आपली सत्ता चालावी म्हणून त्याने इंद्राचा अधिकारही

आपल्या हाती घेतला. नि त्याची सत्ता म्हणजे काय ? अंधेर-नगरीतली बेबंदशाहीच जणू !

सृष्टीवर मोठा अनर्थच ओढवला. सर्व देव भयभीत झाले. आणि ह्या महिषासुराच्या त्रासातून सृष्टीला सोडवा, अशी त्यांनी त्रिमूर्तींना विनंती केली. त्रिमूर्ती म्हणजे ब्रह्मा, विष्णू व महेश. महिषासुराच्या दुष्ट कृत्यांची हकीकत ऐकून ह्या तिघांना फार चीड आली आणि त्यांनी आपल्या अंशापासून एक देवी उत्पन्न केली.



तिला आठ हात होते म्हणून तिला अष्टभुजा म्हणत. सर्व तऱ्हेच्या शस्त्रास्त्रांनी तिला सज्ज करून महिषासुराशी लढाई करण्यास धाडण्यात आले.

आश्विन शुद्ध प्रतिपदेला ह्या युद्धाला सुरुवात झाली नि शुद्ध नवमीपर्यंत–म्हणजे नऊ दिवस ते चालले होते. अखेरीस देवीने महिषासुराला मारले नि सृष्टीला जाचातून सोडविले. त्यामुळे तिचे महिषासुरमर्दिनी असे नाव पडले. नवरात्रात तिचा उत्सव थाटाने साजरा होऊ लागला.

दुष्टाचा नाश झाल्यामुळे त्या वेळी सर्व सृष्टी आनंदात होती. नि आजकालसुद्धा नवरात्रात हा आनंद व्यक्त करण्यात येतो. आपला देश शेतीप्रधान आहे. शेती हा आपला मुख्य धंदा आहे. त्यामुळे शेती मनासारखी पिकणे हे आनंदाचे लक्षण मानले जाते.

नवरात्राच्या पहिल्या दिवशी जमीन सारवून त्यात नऊ तऱ्हेची धान्ये रुजवितात. मध्यभागी कलश उर्फ घट ठेवतात नि त्याला रोज वाढती माळ घालतात. म्हणजे पहिल्या दिवशी एक, दुसऱ्या दिवशी दोन अशा. रुजविलेल्या धान्याला पाणी घालतात नि बाजूला नंदादीप नऊ दिवस अखंड तेवत ठेवतात. हळूहळू पेरलेली धान्ये उगवू लागतात. काही जरा लौकर, काही थोडी उशिरा, मात्र धान्यांचे हे अंकूर पांढरट दिसतात. कारण हे 'शेत' घरात असते ना ? मग ऊन लागल्याशिवाय हिरवा रंग कसा चढणार ? नंतर त्या उगवलेल्या रोपटांवर हळदीचे पाणी मारतात. ते धान्य सोन्यासारखे दिसावे म्हणून ! कारण धान्यामुळे धन–पैसा– मिळते !

नवरात्रातील देखावा फार शांत, भव्य दिसतो ! तो पहाताना मनाला कसे तृप्त वाटते !

नवरात्रातील सातव्या दिवशी सरस्वतीची–विद्येच्या देवीची पूजा करतात. आजकाल घरात पोथ्या असण्याचीच पंचाईत !

तेव्हा त्या दिवशी आपल्या घरातील पुस्तकांच्या कपाटांची साफसफाई अवश्य करावी. त्यामुळे विद्यादेवीचा मान केला जाईल.

नवरात्रातील नवव्या दिवसाला खंडेनवमी म्हणतात. आणि रात्रीच्या वेळी गुजराथी स्त्रिया घटाभोवती फेर धरून गातात व नाचतात. 'गरबा' म्हणतात ह्या नृत्याला.

हल्लीसुद्धा गुजराथी हरिजन स्त्रिया घट नि दिवा घेऊन नवरात्रात रस्तोरस्ती 'गरबा' खेळतात.

बंगाल प्रांतात तर अष्टभुजा देवीच्या सणाला आपल्या कडील दिवाळीच्या सणाचे महत्त्व असते. त्या देवीला ते काली किंवा दुर्गा म्हणतात. देवीच्या समोर गायन, वादन, नृत्य, नाटक हे प्रकार होतातच; पण देवीपुढे बकरा बळी देण्याचीही पद्धत आहे. आपल्या महाराष्ट्रात सुद्धा खंडोबा वगैरे काही प्रखर देवतांच्या समोर कोंबड्या, बकऱ्याचा बळी देतात. ही प्रथा अगदी वाईट आहे. त्याऐवजी पिठाचा बकरा किंवा पिठाचा कोंबडा करून त्याचा बळी अर्पण करावा. पण काही माणसे 'जुने ते सोने' म्हणनच बसतात ना? हवे तर तुम्ही 'नवे ते हवे' म्हणू नका आणि सर्व जुने दूर लोटू नका. पण जुन्यातले वाईट तरी बाजूला टाका नि चांगले तेवढेच घ्या, आणि त्यात नव्यातील चांगले मिसळा नि तडजोडीचा मधला मार्ग काढा. प्रत्येक गोष्ट श्रद्धेने करावी, पण डोळसपणे करावी. कारण अंधश्रद्धा घातक ठरते! आपले वाडवडील करीत त्या गोष्टींच्या मुळाशी असलेले हेतू लक्षात घ्यायला हवेत. नि आज-कालच्या परिस्थितीशी जुळेल असे स्वरूप त्यांना द्यायला हवे! त्यामुळे नव्या पद्धतीने केलेल्या त्या जुन्या गोष्टी कशा सुटसुटीत वाटतील नि आपल्या हल्लीच्या जीवनात मिसळून जातील

आणि जुन्या सणांचा व रूढींचा आपल्याला भलताच बोवाळ वाटणार नाही !

**दसरा**

आता नवरात्र संपले ! आणि दसरा उजाडला ! दसरा हा शब्द दश म्हणजे दहा ह्यावरून आला असून त्याचा अर्थ दहावा दिवस असा आहे. ह्याला **विजयादशमी** असेही म्हणतात, कारण ह्याच दिवशी श्रीरामाने रावणाबरोबर युद्ध करण्यास कूच केले आणि ह्या स्वारीत त्याला विजय प्राप्त झाला. म्हणून ह्या दशमीला लोक विजयादशमी म्हणू लागले.

ह्या दिवशी एकमेकांना सोने म्हणून आपट्याची पाने वाटण्याची पद्धत आहे. त्याला पुढील कथा कारण आहे.

फार प्राचीन काळी पैठण शहरात देवदत्त नावाच्या ब्राह्मणाला कौत्स नावाचा एक मुलगा होता. तो वरतंतू नावाच्या ऋषीकडे विद्या मिळविण्यासाठी गेला. योग्य वेळी त्याने सर्व शास्त्रांचा अभ्यास पुरा केला व " आता गुरुदक्षिणा स्वीकारा " असा त्याने आग्रह धरला. गुरू म्हणाला, " कौत्सा, दक्षिणेसाठी विद्यादान करणे गैर आहे. शिष्य विद्वान् झाला म्हणजे गुरूला मोठा आनंद होतो. नि तीच खरी गुरुदक्षिणा ! "

पण गुरूचे ऋण फेडणे हे आपले कर्तव्य आहे, असे कौत्साला वाटत होते. तो पुनःपुनः आग्रह करू लागला. तेव्हा वरतंतू ऋषीने म्हटले, " मी दक्षिणा घ्यावी असा तुझा आग्रहच आहे तर ? ठीक ! मी तुला चौदा विद्या शिकविल्या. त्या प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी याप्रमाणे चौदा कोटी मोहरा मला आणून दे. "

कौत्साकडे एवढ्या सुवर्णमोहरा कुठून असणार ? पण त्याने आपला शब्द दिला होता. तेव्हा तो रघुराजाकडे गेला.

रघुराजा हा श्रीरामाचा पूर्वज. हा मोठा उदार व विद्वानांना आश्रय देणारा होता. परंतु त्याच वेळी रघुराजाने नुकताच विश्वजित यज्ञ केला होता. आणि ब्राह्मणांकडून आपला सर्व खजिना लुटला होता. त्यामुळे त्याच्याकडे चौदा कोटी मोहरा नव्हत्या. परंतु दारी आलेल्या ब्राह्मणाला तसाच परत पाठविणे त्याला बरे वाटेना. त्याने कौत्साकडून तीन दिवसांची मुदत मागून घेतली व मोहरा मिळविण्याकरिता तो इंद्रावर स्वारी करण्या-साठी निघाला. ही गोष्ट इंद्राला कळताच त्याने कुबेराला बोला-विले. कुबेर हा धनाचा देव आहे. देवांच्या द्रव्यांचे भांडार तो राखत असतो. इंद्राने कुबेराला सांगितले की, " रघुराजाच्या अयोध्यानगरीच्या बाहेर असलेल्या शमीच्या नि आपटचाच्या झाडावर मोहरांचा पाऊस पाड ! "

कुबेराने त्याप्रमाणे मोहरांचा पाऊस पाडला. ते पाहून, रघुराजाने इंद्रावर स्वारी करण्याचा बेत सोडला आणि त्याने कौत्साला त्या सर्व मोहरा दान केल्या. नि कौत्साने त्या वरतंतू ऋषीला सर्व अर्पण केल्या; परंतु ऋषीने फक्त चौदा कोटी मोहरा स्वीकारल्या आणि बाकीच्या कौत्साला परत दिल्या. वास्तविक त्या सर्व मोहरा रघुराजाने कौत्साला दिल्या होत्या. तेव्हा कौत्साने त्या स्वतःला ठेवून घेण्यास हरकत नव्हती. पण त्याने त्या आपल्यासाठी का मागितल्या होत्या ? त्याला फक्त आचार्य-ऋण फेडावयाचे होते ! स्वतःसाठी त्याला त्या धनाचा लोभ वाटला नाही ! त्याच्यापाशी विद्याधन भरपूर होते ना ? त्या विद्याधनाच्या बळावर त्याला मान मिळाला असता नि गरजे-पुरते धनही मिळाले असते ! त्या काळी धनापेक्षा मानाचे महत्त्व अधिक होते ! नि इतर धनापेक्षा विद्याधनाला विशेष मान असे!

**हादगा**

पाटावर रांगोळीने किंवा धान्याने हत्तीचे चित्र काढतात. नि त्याच्याभोवती फेर धरून वाढत्या क्रमाने गाणी म्हणतात. पहिल्या दिवशी एक, दुसऱ्या दिवशी दोन नि शेवटच्या दिवशी सोळा गाणी म्हणतात. नंतर खिरापत वाटतात. वाटण्यापूर्वी खिरापत ओळखण्यासाठी प्रश्नोत्तरांची गंमत होते.

पावसाळचा दिवसात घराबाहेर पडता येत नाही. त्यामुळे कंटाळा येतो. हादगा घांतला तर सोळा दिवस कसे मजेत जातात; करमणूक होते. नि जुन्या गाण्यांना अनायासे उजळा मिळतो. मुलींनी अवश्य हादग्याचा सण साजरा करावा.



हादग्यातील गाण्यांचा आकडा वाढू लागल्यावर तो कार्यक्रम आटोपायला बराच वेळ लागतो. त्यामुळे घरोघरी हादगा घालण्या ऐवजी मुली मुली एकत्र जमून हादगा घालतात नि अशा उत्सवा-मध्ये नेहमीच भाग घेणारांच्या संख्येवर करमणुकीचे व आनंदाचे

वैपुल्य अवलंबून असते ! जितक्या मुली अधिक तितकी गंमत अधिक !

अशा रीतीने उत्सव साजरे करण्याची लहानपणापासून सवय असणे फार उत्तम ! कारण त्यामुळे एकमेकांची मने सांभाळण्याची कला अंगी येते, माणुसकी वाढते आणि आपोआप उत्तम नागरिक बनता येते. अन् आपली जुनी संस्कृती थोडीफार जिवंत रहाते. अशा रीतीने एकात अनेक गोष्टी साधल्या जातात.

आपण देवाचे दशावतार मानतो. पण हे दहाही अवतार देवाचे-पुरुषाचे आहेत. नवरात्रामधला महिषासुरमर्दिनीचा अवतार हा एकच स्त्रीचा अवतार आहे ! म्हणून शक्तिदेवीची ही कथा आपण लक्षात ठेवावयास हवी !

**कोजागरी**

ह्यानंतर आश्विन पौर्णिमेला कोजागरीचा सण येतो. आता पावसाळा संपत आलेला असतो. चार महिने आकाश ढगाळलेले असे; ते आता स्वच्छ निरभ्र झालेले असते. नि त्यामुळे ह्या पौर्णिमेला फारच शुभ्र, टिपूर चांदणे पडते.

कौमुदी ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ चांदणे असा होतो. परंतु ह्या कोजागरी पौर्णिमेला कौमुदी म्हणण्याचा प्रघात आहे. नि कोजागरीच्या उत्सवाला त्याचमुळे कौमुदी उत्सव म्हणतात.

ही शरत्पौर्णिमा हा लक्ष्मीच्या पूजेचा दिवस आहे. त्या रात्री घरात चहूकडे दिवे लावतात आणि लक्ष्मीच्या मूर्तीची पूजा करतात. ह्या पौर्णिमेच्या रात्री लक्ष्मी जिकडेतिकडे फिरते आणि जे कोणी चांदण्याची मजा लुटत जागे असतील त्यांना प्रसन्न होते असे मानतात. म्हणून लोक कोजागरी जागवितात. गाणी, गप्पा पत्ते अशा गंमती करीत चांदण्यात बसतात. त्यामुळे आपल्या

रोजच्या जीवनात थोडा पालट होतो आणि मनाला व शरिराला उत्साह वाटतो !

तसे म्हटले तर पौर्णिमा दर महिन्यालाच यते. पण ह्या कौमुदीपौर्णिमेची वेगळीच अपूर्वाई वाटते. तिच्या चांदण्यातून जणू अमृत ठिपकते असे वाटते. आटीव दूध किंवा पोहे खाताना वेगळीच मौज वाटते. गच्चीत बसल्या बसल्या वनभोजनाचा आनंद लाभतो नि त्यामुळे मनाला व शरिराला आलेली हुषारी कितीतरी दिवस टिकते. मुले चांदण्यात हुतुतू, आटचापाटचा यासारखे खेळही खेळतात.

रविवारची सुट्टी शाळेला असते. पण असे उत्सव साजरे केले की ही सुट्टी सगळ्या घरादाराला असते. घरातील माणसांना येणाऱ्या कंटाळवाणेपणाला सुट्टी असते ही! तेव्हा नुसती गंमत म्हणून नव्हे तर एक आवश्यक, उत्साहवर्धक योजना म्हणून आपले असले जुने उत्सव साजरे करावेत.

**दिवाळीचा सण**

आता ह्यानंतर आपला सबंध वर्षातला मोठा दिवाळीचा सण येतो. वास्तविक दिवाळी म्हणजे एक सण नसून सणांचे संमेलन आहे. नवरात्रापासून भाऊबिजेपर्यंत लहानमोठे सण येत असतात. आणि धनत्रयोदशीपासून भाऊबिजेपर्यंतचे पाच दिवस विशेषच सोहाळ्याचे असतात.

खरोखर, दिवाळी हे सणांचे अजब घर आहे. एकाहून एक मोठे सण आहेत हे.

**धनत्रयोदशी**

आता **धनत्रयोदशीपासून** सुरुवात करू या. दिवाळीला आता आरंभ झाला, असे ह्या दिवशी वाटू लागते. अपेक्षेच्या

आनंदाचा आरंभ होतो. पुढे दिवाळीतील एकेका सणात काय काय गम्मत करावयाची हे बेत सुरू होतात. नि प्रत्यक्ष प्राप्तीच्या आनंदापेक्षा ह्या अपेक्षेच्या आनंदाची गोडी न्यारी असते !

दारांच्या पुढ्यात किंवा अंगणात जागा सारवायची. त्यावर रांगोळीचा कणा काढावयाचा. पणत्या शोधून काढून, धुऊन पुसून ठेवावयाच्या, हा थोडा का बोवाळ असतो ? त्यातच आई, काकू फराळाच्या गोड, तिखट जिनसा करतात त्याचा मासला पहावयाचा.


तिन्हीसांजा पणत्या पेटविल्या म्हणजे दीपावली--दिव्यांची ओळ—हे नाव सार्थ झालेले दिसते !

अन् ह्या दिव्यांच्या चकचकाटातच धनत्रयोदशीच्या कथेचे सार सांगितले आहे. ठाऊक आहे का ते तुम्हांला ?

एकदा यमराजाने आपल्या दूताला—नोकराला—प्रश्न केला "काय रे, मृत्युलोकातून—पृथ्वीवरून—तुम्ही माणसांचे प्राण हिरावून आणता. हे काम करताना तुम्हांला कधी वाईट वाटण्यासारखा प्रसंग घडला आहे काय ? "

त्यावर दूत हात जोडून म्हणाला, "महाराज, मृत्युलोकातील हैम राजाच्या मुलाचे प्राण हिरावून आणताना आम्हांला फार दुःख झाले. ह्या मुलाच्या लग्नाचा सोहळा आनंदाने साजरा होत होता. सगळीकडे उत्साह भरला होता. नि लग्नाच्या चौथ्या दिवशी त्याचे प्राण हरण करावे लागले आम्हाला ! हा मृत्यू नव्हे अपमृत्यू—वेळेच्या आधी आलेला मृत्यू—आहे हा ! तेव्हा पुनः असा अपमृत्यूचा प्रसंग कोणावर येऊ नये, अशी आमची विनंती आहे."

दूताचे हे बोलणे ऐकून यमराज गंभीर झाले आणि त्यांनी म्हटले, " ठीक आहे ! आज आश्विन वद्य त्रयोदशी—धनत्रयोदशी—आहे. आजपासून पाच दिवस जे दीपोत्सव साजरा करतील त्यांच्यावर असा अपमृत्यूचा प्रसंग येणार नाही ! " आणि तेव्हा-



पासून धनत्रयोदशीच्या दिवसापासून भाऊबिजेपर्यंत दिव्यांचा चकचकाट करण्याची पद्धत पडली.

परंतु नुसत्या दिव्यांच्या रोषणाईने का कुठे मरण टळणार आहे ? आपले आरोग्य नीट राखले तरच मृत्यू दूर पळेल ! आणि ह्या गोष्टीची स्वत:ला आठवण देण्यासाठी दिव्यांचा चकचकाट करावयाचा. जणू ह्या चकचकाटामुळे डोक्यातही प्रकाश पडू शकतो आणि हैम राजाच्या मुलाची ही कथा ऐकल्यामुळे आपण सावध होतो. ' पुढल्यास ठेच मागचा शहाणा ' म्हणतात ते खरे आहे ! तेव्हा आपल्याला दीर्घ आयुष्य मिळावे, म्हणून शक्य तो निसर्गाच्या नियमांनुसार वागण्याचा ह्या दिवशी निश्चय करावयाचा आणि पुढल्या धनत्रयोदशीला तो पुढे चालू करावयाचा.

आरोग्य हे मोठ्यात मोठे धन आहे. तेव्हा धनत्रयोदशीला ह्या आरोग्यधनाची पूजा करण्याइतके चांगले दुसरे काहीच नाही ! अर्थातच आपले आरोग्य पूजा करण्यालायक असावयास हवे ! गेल्या सबंध वर्षात आपली प्रकृती कशी होती, ह्याचा

आढावा ह्या दिवशी घ्यावा आणि एखादा दुसरा किरकोळ त्रास सोडला तर प्रकृती ठीक होती, असे आढळले तर आपले आरोग्य खात्रीने पूजा करण्यालायक ठरेल !

खरे म्हणजे आपली प्रकृती उगीच किंवा अकारण बिघडत नसते. निसर्ग हा काटेकोर शिक्षक आहे. नि ह्या शिक्षकाने घालून दिलेले नियम आपण मोडले की लगेच त्याची शिक्षा आपल्याला भोगावी लागते. आहार म्हणजे खाणे व विहार म्हणजे व्यायाम ह्या दोन्हीबाबत आपण शिस्तीत वागलो तर आपले आरोग्य उत्तम राहील ! पण हावरेपणा किंवा चुकारपणा केला की, त्याचा वचपा निघालाच ! तेव्हा आरोग्य उत्तम राखणे पुष्कळसे आपल्या हातात आहे, नि ते उत्तम राखले तर आपल्यासारखे श्रीमंत नि सुखी आपणच ! कारण सर्वांत मोठे धन आपल्याला लाभले आहे ! तेव्हा धनत्रयोदशीला आपल्या आरोग्याची पूजा करण्याच्या योग्यतेचे ते ठरेल, अशी काळजी घेऊनच वर्षभर वागावयाचे, असा निश्चय करा आणि तो व्यवस्थित पाळा.

**नरक-चतुर्दशी**

आता ह्यानंतर नरक-चतुर्दशीचा सण येतो. आपल्या भारताच्या उत्तरेला नेपाळ व भूतान प्रांताच्या दक्षिणेकडे पूर्वी प्राग्ज्योतिष नावाचा एक प्रांत होता. तिथे नरकासुर नावाचा राजा राज्य करीत असे. तो अतिशय दुष्ट व क्रूर होता. आसपासच्या अनेक राजांना त्याने सतावले होते. आणि सोळा हजार स्त्रिया त्याच्या कैदेत होत्या. त्याने इंद्राचे छत्र हिरावून घेतले होते. देवांची आई अदिती हिच्या कानांतील कुंडले हरण केली होती; आणि अमर पर्वतावरील मणिपर्व नावाचे स्थानही देवां–

पासून काढून घेतले होते. आपल्याला कोणी जिंकता कामा नये, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. आणि म्हणून त्याने आपल्या राजधानीच्या सभोवती पर्वतांचे व शस्त्रांचे कोट रचले.

नरकासुराची दुष्ट कृत्ये श्रीकृष्णाच्या कानावर आली व त्याने नरकासुराचा नाश करण्याचा निश्चय केला. पण श्रीकृष्णाची बायको सत्यभामा हिने ती कामगिरी आपल्या शिरावर घेतली. जणू महिषासुराचा नाश करणारी शक्तिदेवीच ! श्रीकृष्ण फक्त तिला मदत करण्यास बरोबर गेला आणि आश्विन वद्य चतु-



र्दशीच्या पहाटे सत्यभामेने नरकासुराला मारले व त्याच्या कैदेतील स्त्रियांना मोकळे केले. तेव्हा त्यांनी आपापल्या घरी दिवे पेटवून, रांगोळ्या काढून आनंद व्यक्त केला. नि त्या प्रीत्यर्थ

आपण अजुनी नरक-चतुर्दशीच्या दिवशी पहाटे उठून स्नान करतो. नंतर रांगोळी घालून फराळ करतो नि आनंदोत्साहाने हा दिवस साजरा करतो.

सत्यभामेने नरकासुराचा नाश केला. तिच्या बाबतीत नरकासुर हे विशेषनाम होते. पण तसल्या सामान्यनामाचा—नरकाचा—नाश नाही का आपल्याला करता येणार ? आपल्या घरात व घराभोवती किती घाण असते. घाण म्हणजे नरक. नि आपण हा नरक नाहीसा केला पाहिजे. घरातील मोऱ्या व अंगण वगैरे झाडून स्वच्छ ठेवण्यास आईला मदत करावयास हवी ! कारण सांडपाणी व कचरा साठल्यामुळे हवा अशुद्ध होते. आणि त्यामुळे मग रोगराई उत्पन्न होते व पसरते. डी. डी. टी. सारखे जंतुनाशक द्रव्य घरी करता येते नि ते स्वस्त पडते. तेव्हा असे जंतुनाशक द्रव्य घाण साचणाऱ्या ठिकाणीं टाकावे, आणि अशा रीतीने आपले आरोग्यधन चोरावयास टपून वसलेल्या नरकासुराचा नाश करावा.

मनुष्यप्राणी अनुकरणप्रिय असतो. एका घरातील मुले-माणसे असा नरकासुराचा नाश करताना दिसली की, आजूबाजूच्या घरातील मुले-माणसेही आपापल्या घरातील नरकासुराचा नाश करतील. आणि प्रत्येकाने आपापले घर व अंगण स्वच्छ ठेवले की सबंध गाव स्वच्छ होईल ! तेव्हा ह्या पद्धतीने आपण नरक-चतुर्दशी साजरी करू या.

### लक्ष्मी-पूजन

नरक-चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी अर्थातच अमावास्या येते. पण ही अमावास्या सणासारखी मानतात. नि ह्या दिवशी लक्ष्मीपूजन करितात.

ह्यासंबंधी अशी कथा आहे. प्राचीन काळी बळी नावाचा राजा होऊन गेला. त्याने देवांना कैदेत घातले नि लक्ष्मीला आपली दासी बनविली. परंतु बळीराजा दानधर्म करून व्यवस्थित वागत होता. त्यामुळे त्याला शासन करता येईना ; पण हळूहळू त्याची सत्ता वाढू लागली तसा तो धुंद बनला आणि अन्यायाने वागू लागला. तेव्हा श्रीविष्णूने वामनावतार घेतला आणि बळीचा नाश केला व लक्ष्मीची सुटका केली.

आश्विनातील अमावास्येच्या दिवशी लक्ष्मीची सुटका झाली. म्हणून त्या दिवशी लक्ष्मीपूजन करतात.

दुकानदार व व्यापारी लोक आपल्या जमाखर्चाच्या वह्या, दुकानातील माल व गल्ला ह्यांची पूजा करितात.

ह्या अमावास्येला गुजराथेत महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती यांचे पूजन होते. दौत, रुपया व चोपडी ही या तीन देवतांची प्रतीके मानतात.

बंगालमध्ये अमावास्येच्या दिवशी कालीची पूजा करितात.

दिवाळीच्या ह्या दिवसात दिव्यांचा चकचकाट असतो. जणू दिवस व रात्र ह्यांतील अंतर नाहीसे होते. आणि रात्रीचा दिवस होतो. रात्रीचा अंधार नष्ट होतो.

**दिवाळीची सुट्टी**

उन्हाळ्याच्या सुट्टीच्या खालोखाल ही दिवाळीची सुट्टी असते. शाळेला पाऊण महिना सुट्टी असते नि अभ्यासाचा तितकासा जोर नसतो. मग ही सुट्टी काय नुसती खाण्यात, खेळण्यात दवडायची ? सुट्टीचा सदुपयोग करायला हवा ! ह्या सुट्टीत मुलींनी घरगुती शिवणकाम चांगले शिकून घेण्याचा निश्चय करावा.

मुलींना विणकाम, भरतकाम वगैरे प्रकार आवडतात. पण शिवणकामाचा त्या कंटाळा करतात. वस्तुतः शिवणकामच विशेष महत्त्वाचे असते. ते मुलींनाच नव्हे, तर मुलांनाही यायला हवे. मुलांनासुद्धा आपल्या सदऱ्याच्या गुंड्या टाचायला येणे उत्तम. त्याचप्रमाणे थोडेसे फाटलेले, उसवलेलेही त्यांना शिवायला यावे. त्यामुळे माणूस स्वावलंबी होतो तेव्हा दिवाळीच्या सुट्टीत मुला-मुलींनी घरगुती शिवण शिकावे. ठिगळ लावणे नि रफू करणे ह्यासुद्धा भरतकामासारख्याच कौशल्यपूर्ण कला आहेत. पण मुलींना त्या रुक्ष वाटतात. हे चुकीचे आहे.

आवडती गोष्ट आवडीने कोणीही करील. पण आवश्यक गोष्ट आवडीने करणे खरे महत्त्वाचे आहे! नि ठिगळ लावणे, रफू करणे, उसवलेले शिवणे ह्या आवश्यक गोष्टी आहेत. कपडा थोडासा उसवला असला नि तो तेवढ्यात शिवला तर श्रम वाचतात नि कपडा अधिक फाटण्याचेही वाचते.

इंग्रजीत म्हण आहे की, वेळीच एक टाका घातला तर नऊ टाके घालण्याचे वाचतात ! ही अगदी खरी म्हण आहे. प्रत्येक मुलीने ध्यानात घ्यायला हवी ! नि सुट्टीत 'वेळीच एक टाका' घालण्याची कला आपण शिकून घेतली पाहिजे.

आजकाल सर्रास चहूकडे विजेचे दिवे असतात नि बऱ्याच वेळा विजेची 'फ्यूज्' जाते. काळोख नि कामाचा खोळंबा होतो. तेव्हा ही 'फ्यूज्' बसविण्याची कलाही मुलांमुलींनी सुट्टीत शिकून घ्यावी.

आणखी इतरही कला संधी मिळेल त्याप्रमाणे दिवाळीच्या सुट्टीत शिकून घ्यावयास हव्यात. कारण नुसती गंमत करण्यापेक्षा व खेळण्यापेक्षा असल्या काही कला शिकून घेतल्या म्हणजे

मनाला वेगळाच उत्साह वाटेल ! तुमचा आत्मविश्वासही वाढेल. आणि तुम्ही कुटुंबातील एक उपयुक्त व्यक्ती ठराल ! केवढे मानाचे स्थान मिळेल तुम्हाला ? अन् मग पुढल्या सुट्टीला असाच सदुपयोग करण्याची चुरस वाढेल. नि सुट्टीत मुले त्रास देतात, दंगा करतात, असे म्हणण्याची वडील माणसांवर पाळी येणार नाही !

मग दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सर्वच सुट्ट्यांचा असा सदुपयोग करण्याचा निश्चय कराल ना ? करा नि तो नीट पाळा बरं का.

**मुक्ताबाईची जयंती**

आश्विनाच्या शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्र सुरू झाले. नि त्याच दिवशी मुक्ताबाईची जयंती असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेला मुक्ताबाईचा आळंदी मुक्कामी जन्म झाला.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई असे म्हणतातच. कारण चौघा भावंडात मुक्ताबाई सर्वांत लहान. धर्मगुरूंच्या सांगण्यावरून ह्या मुलांच्या आईवडिलांनी प्राणत्याग केला. तेव्हा निवृत्ती व ज्ञानेश्वर भिक्षा मागून आणीत नि सोपान-मुक्ताबाईला संभाळी.

मोठे तिघे भाऊ विद्वान निघाले. अर्थातच मुक्ताबाई मागे कशी राहील ? निवृत्तिनाथाला तिने आपला गुरू मानले आणि तीही ज्ञानी झाली. ती कविता उत्तम करीत असे. तिचे ताटीचे अभंग फार प्रसिद्ध आहेत.

एक दिवस काय झाले, ज्ञानेश्वर नेहमीप्रमाणे भिक्षा मागून घरी परतले. पण एका टवाळाने त्यांना हिणविले. " संन्याशाच्या पोराचे दर्शन झाले. अपशकुन झाला हा" असे तो बोलला. हे

शब्द ऐकून ज्ञानेश्वर खिन्न झाले आणि दार बंद करून खोलीत बसले. मुक्ताबाईने हाका मारल्या तरी ताटी–दार–उघडेनात. तेव्हा मुक्ताबाईने त्यांना पुन: विनंती केली. थोडा उपदेश केला



नि ज्ञानेश्वरांनी ताटी उघडली. ते हे ताटीचे अभंग !

ज्ञानेश्वरीसारखा बिनमोल ग्रंथ लिहिणाऱ्या विद्वान वडील भावाला धाकट्या बहिणीने समजावले, ह्यावरून मुक्ताबाईची योग्यता कळून येते ! त्या सुंदर अभंगांचा हा नमुना पहा.

**विश्व राग झाले वन्ही। आपण सुखे व्हावे पाणी ।।**
**योगी पावन मनाचा । साही अपराध जनांचा ।।**
**जीभ दातांनी चावली। कोणे बत्तिशी पाडली ।।**
**इतुके ऐकूनि शांती धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।**

किती अर्थ भरला आहे ह्या अभंगात ! रागामुळे जग विस्तव झाले ! मग आपण पाणी होऊन त्याला थंड करावे. पवित्र मनाचे योगी–साधू–तुम्ही, लोकांनी अपराध केला तरी तो सहन करावयाला हवा ! आपली जीभ आपल्याच दातांखाली सापडली म्हणून कोणी बत्तीस दात का पाडते ?

ज्ञानेश्वरांसारख्या संतांनी जगाला शांतीचा धडा घालून द्यावयाचा. मग त्यांनी कसे रागाच्या आधीन व्हावयाचे ?

असे असूनही क्षणभर ज्ञानेश्वर सामान्य माणूस बनले. रागाचा स्पर्श त्यांच्या चित्ताला झाला ! पण धाकट्या मुक्ताबाईने त्यांना वेळीच सावध केले. ज्ञानेश्वर ताटी उघडून बाहेर आले नि मुक्ताबाईला मिठी मारून त्यांनी तिच्या शहाणपणाचे कौतुक केले.

मुक्ताबाई एवढी शहाणी होती. पण थोड्या महिन्यांच्या अंतराने ज्ञानेश्वर नि सोपानदेव समाधिस्थ होताच दुःखाने वेडीपिशी झाली. ह्या चौघा भावंडांच्या साखळीतील मधले दोन दुवे खळखळ तुटले नि त्यामुळे मुक्ताबाई व निवृत्तिनाथ खचले.

मुक्ताबाईला हे आघात सहन झाले नाहीत. ती त्यानंतर थोड्याच महिन्यांनी हे जग सोडून गेली.

संत नामदेवाने ह्याबद्दल असे वर्णन केले आहे :

**'होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई। संत ठायी ठायी स्फुंदताती ।'**

क्र. १ ९४७३ ९४।९।७३
विषय

मुक्ताबाईचे गाव [illegible] मैलांवर एदलाबाद गावी तिचे मंदिर बांधले आहे.

**या आश्विन महिन्यात** अगदी पहिल्या दिवसापासूनच सणांना सुरुवात झाली. नवरात्र-दसरा-कोजागरी-धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी नि शेवटी लक्ष्मीपूजन किती सण नि उत्सव ! आपण सणाच्या दिवशी पक्वान्ने खाऊन सुस्ती नाही येऊ द्यावयाची. जुन्या सणांना नवे वळण लावायचे. आणि आपल्या बुद्धीला चालना देऊन समाजाचे हित साधावयाचे. म्हणजे सणापासून मिळणारा आनंद टिकाऊ ठरेल ! चार दिवस गोड-धोड खाल्ले की संपले ! एवढाच ह्या सणांचा अर्थ नाही.

ह्या सणांच्या मुहूर्तावर आपल्या माणसांचे, आपल्या समाजाचे व आपल्या देशाचे हित साधेल, अशा कामांचा प्रारंभ करावयाचा आणि चिकाटीने ती शेवटाला न्यावयाची. म्हणजे हे सण उत्तम रीतीने साजरे केले असे होईल !

## स्वाध्याय

( १ ) नवरात्राचा उत्सव नऊ दिवसच का करतात ?

( २ ) दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सोने लुटून आणण्याची प्रथा कशी पडली ?

( ३ ) धनत्रयोदशीपासून भाऊबिजेपर्यंत दीपोत्सव साजरा का केला जातो ?

( ४ ) नरकासुराची आख्यायिका सांगून त्या कथेतील ग्राह्यांश सांगा.

( ५ ) मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांचा राग कसा शांत केला ?

BVBK-0401543